जा.क. 561/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा

दिनांक : 19/10/2018

| अ. क्रं | पो.ठाणे गु.र.नं. व कलम | फिर्यादीचे पुर्ण नांव, व पत्ता | आरोपीचे पुर्ण नाव, व पत्ता | घटना स्थळ व घटना ता.व वेळ | गुन्हा दाखल ता. व वेळ | घटना स्थळ | गुन्हयाची थोडक्यात हकीकत तपासणी अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | |
| 1 | **पवनी** अप.क. 277/2018 कलम 324, 294 भादवी | सौ. विजुबाई दुर्योधन मंडारे वय 50 वर्ष रा. बामनी ता जि. भंडारा | रामलाल गंगाराम खंडाते वय 45 वर्ष रा. बामनी ता. जि. भंडारा | 17/10/2018 चे 21.00 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 02.12 वा. | बामनी 8 कि.मी. उत्तर | यातील आरोपी व फिर्यादी हे भाऊ बहिन असुन आरोपी हा दररोज दारू पाणी पिऊन त्याचे आई वडीलांना मारपिठ करतो म्हणुन यातील फिर्यादी ही आपले भावाला समजविण्याकरीता त्यांचे घरी जावुन त्याला म्हणाली की, तु दररोज दारू पाणी पितो आणि आई वडीलांना मारपीट करतो यावरुन आरोपीने जखमी फिर्यादीला म्हणाला की, तु कशाची बहिन असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून काठीने डोक्यावर मारुन तसेच उजव्या डोळयाचे भोवईवर चावा घेवुन जखमी केले असे फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस नायक कडपते हे करित आहेत मो. न. 8408032528 |
| 2 | **तुमसर** अप.क. 504/2018 कलम 379 भादवी | सरफराज हुसेन अब्दुल गालीब कुरेशी वय 31 वर्ष रा. साई कॉलोनी तुमसर | अज्ञात | 17/10/2018 चे 23.00 ते 18/10/2018 चे 04.00 वा. | 18/10/2018 चे 11.55 वा. | साई कॉलोनी तुमसर 2 कि.मी. पश्चिम | यातील फिर्यादी याने आपले ॲपल कंपनीचे आयफोन 7+ 32 जीबी ब्लॅक मोबाईल एकुण कि. 59,900/- रु चे बेड चे बाजुला चार्जीगवर लावुन झोपले असता कोणीतरी अज्ञात चोराने खिडकीतुन हात टाकुन त्याचे मोबाईल फोन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्थेशन तुमसर येथे गुन्हा नोदं करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार बावणे हे करित आहेत मे.न. 7720066917 |
| 3 | **जवाहरनगर** अप.क. 216/2018 कलम 324 भादवी | रामभाउ श्रीरामजी भोयर वय 40 वर्षे रा लोहारा धंदा मजुरी | प्रमोद गणेश शिंदे वय 30 वर्षे रा. लोंहारा | 18/10/2018 चे 17.30 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 20.52 वा. | लोहारा 6 किमी दक्षीण | यातील फिर्यादी हा घरुन रोडाने आपले भावाचे घरी टोलीवर जात असतांना यातील आरोपीने तु माझे दारुचे मडके का फोडलास असे बोलुन भांडण करुन फिर्यादीचे डावे बाजुच्या कानाचे वर डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी परीक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार सार्वे हे करित आहेत मो.न. 7507507167 |
| 4 | **मोहाडी** अप.क. 145/2018 कलम 379 भादवी | उमेश बोदाजी पोटफोडे वय 40 वर्षे रा रोहणा ता मोहाडी | सुनिल डोमाजी कळव वय 30 वर्ष रा. रोहणा **आरोपी अटक आहेत.** | 11+12/10/2018 चे रात्र दरम्याण | 18/10/2018 चे 19.41 वा. | रोहना शेतशिवार 8 किमी पुर्व | यातील फिर्यादीने हरीराम मोटधरे रा.रोहणा याची धानाची शेती ठेक्याने केली असता शेतीला पाणी देण्यासाठी शेतीलगत असलेल्या नाल्या जवळ गंगोत्री कंपनीची मोटार पंप मॉडल नं 100 दिड एचपी ची जुनी वापरती हीरवा पेंट लावलेली कि. अंदाजे 8000/- रु ची लावली होती ती कोनीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस नायक राउत हे करित आहेत मो.न. 9284013219 |
| 5 | **भंडारा** अप.क. 841/2018 कलम 324, 504, 506, 34 भादवी | नरविर सुखराम मेश्राम वय 40 वर्ष रा. आंबेडकर वार्ड मुजबी | 1) भुषण विनोद देशभ्रतार वय 19 वर्ष 2) शुभम विनोद देशभ्रतार वय 24 वर्ष दोन्ही रा. मुजबी **आरोपी अटक आहेत.** | 18/10/2018 चे 18.52 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 13.31 वा | आंबेडकर वार्ड मुजबी 07 कि.मी. पश्चिम | यातील आरोपी कमांक 1 ने आपली मोसा फिर्यादी जखमीचे घरासमोर रोडावर आडीवी ठेवल्याने त्यास रोडाच्या बाजुला मोसा लाव असे फिर्यादीने म्हटले असता आरोपीने तुझ्या वडीलांचा रोड आहे का असे म्हणुन आरोपीतांनी फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करून लाथा बुक्याने तसेच आरोपी कमांक 2 नी काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी परिक्षण अहवाला वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार गाढवे हे करित आहेत मो.न. 9049277174 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | भंडारा अप.क. 842/2018 कलम 379 भादवी | उमेश अरुनराव उदापुरे वय 38 वर्ष राहणार वनश्रीनगर नगर खात रोड भंडारा धंदा नोकरी | अज्ञात | 14/10/2018 चे 14.30 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 17.55 वा | सावजी भोजनालय जवळ मोठा बाजार भंडारा | यातील फिर्यादीने आपली मोसा पॅशन प्लस हिरो होन्हा कंपनीची कमांक एमएच 31 डीआर 2056 किमती 20000/- रु ची मोठा बाजार सावजी भोजनालय. जवळ ठेवुन खरेदी करण्यास गेले असता परत येवुन ठेवलेल्या ठिकाणी मोसा पाहीली असता दिसुन आली नाही. तीचा 3 दिवस शोध घेतला असता मिळून न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने मोसा चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार चोपकर हे करित आहेत मो.न. 9420865162 |
| 7 | साकोली अप.क. 391/2018 कलम 324 भादवी | उल्लास तुकाराम घोरमारे वय 32 वर्षे रा. तुळमापुरी सरतर्फे फिर्यादी सफौ रवींद्र मडावी ब.नं 25 पो. स्टे. साकोली | रोशनद चौधरी वय 38 वर्षे रा. नागपुर ह.मु. तुळमापुरी | 18/10/2018 चे 20.30 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 23.41 वा. | तुळमापुरी 9 किमी पुर्व | यातील फिर्यादी व त्याचे घोरमारे परीवारातील लोकांनी दशरा सन साजरा करण्याचे उददेशाने हनुमान मंदीर ते गावातुन रॅली काढुन सार्वजनिक शारदा उत्सव मंडळ तुडमापुरी यांची शारदा विसर्जन रॅली गावात रस्त्यात निघाली असता फिर्यादीने प्रकाश खरत याला तुमची शारदा विसर्जन रॅली रोडाचे एका बाजुला करा असे बोलत असता आरोपी याने फिर्यादीस तु कशाला वाद करतेस असे बोलुन त्याचे जवळील बारुद फोडण्याचे लोंखडी सलाखीने फिर्यादीचे डोक्यावर डावे बाजुला मारुन आप खुशीने दुखापत केल्याने जखमी फिर्यादी हा उप जिल्हा रुग्णालय साकोली येथे भरती असुन फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी परिक्षण अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सहायक फौजदार रविंद्र मडावी पोलीस स्टेशन साकोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार टेभुर्णे हे करित आहेत मो.न. 9764453273 |
| 8 | भंडारा अप.क. 843/2018 कलम 184, 185(1) मोवाका | सरतर्फे फिर्यादी स.फौ. दिघोरे ब.नं. 705 वानिशा भंडारा | वाहन कमांक एमएच 40 एके 7244 चा चालक मंगेश सुखदेव मटाले वय 28 वर्ष रा. हरदोली | 18/10/2018 चे 18.45 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 14.43 वा. | नागपुर नाका भंडारा 03 कि.मी. पश्चीम | यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत बेदरकारपणे चालवितांनी पंचासमक्ष मिळून आल्याने त्याची सा.रु. भंडारा येथील वैघकीय अधिकारी यांचे कडून तपासणी केली असता त्यानी आरोपी हा दारु पिला असल्याचे अभिप्राय रिपोर्ट दिल्याने सरतर्फे फिर्यादी सहायक फौजदार दिघोरे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार गजभिये हे करित आहेत मो.न. 9403060284 |
| 9 | लाखांदुर मर्ग. क. 37/2018 कलम 174 जाफौ | सरतर्फे फिर्यादी पोलीस हवालदार उदाराम ठाकरे ब.न. 237 पोस्टे लाखांदुर | **मृतक** :- सौ. रागीनी लवकुश नाकतोडे वय 32 वर्ष रा. मांढळ | 15/10/2018 चे 08.00 वा. ते 20.00 वा. दरम्यान | 18/10/2018 चे 14.43 वा. | ग्रारु ब्रम्हपुरी /मांढळ ता. लाखांदुर | यातील मृतक हिने मांढळ ता. लाखांदुर जि. भंडारा येथे स्वतःचे घरी विषारी औषध खाल्याने तीला ग्रामीन रुग्नालय ब्रम्हपुरी येथे उपचार कामी भरती करण्यात आले होते उपचार सुरु असतांनी ग्रामीन रुग्नालय ब्रम्हपुरी येथे मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे मर्ग कमांक 00/2018 कलम 174 जाफौ प्रमाणे दाखल होवुन मृतकाचे मरणाबाबत प्राथमिक कार्यवाही करुन पोस्टे ब्रम्हपुरी येथुन जा.क. 1648/2018 दि. 18/10/2018 अन्वये कागदपत्रे पोस्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोलीस हवालदार उदाराम ठाकरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार उईके हे करित आहेत मो.न. 9604037933 |
| 10 | लाखनी मर्ग.क. 46/2018 कलम 174 जाफौ | संदीप पांडुरंग गोमासे वय 25 वर्षे रा कनेरी दगडी | **मृतक** :- आदीनाथ पांडुरंग गोमासे वय 21 वर्षे रा कनेरी दगडी | 18/10/2018 चे 00.10 वा.दरम्यान | 18/10/2018 चे 21.32 वा. | नागपुर नाका भंडारा 03 कि.मी. पश्चीम | यातील मृतक हीची अचानक प्रकृती बिघडल्याने तीला सारु भंडारा येथे दि 17/10/2018 चे सकाळी 10.00 वा. दरम्यान भरती केले असता उपचारा दरम्याण मृतक ही दि. 18/10/2018 चे 00.10 वा मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग कमांक 00/2018 कलम 174 जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे नंबरी मर्ग नोदं करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार सार्वे हे करित आहेत मो.न. 8605810185 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | जवाहरनगर मर्ग.क. 24/2018 कलम 174 जाफौ | सरतर्फे फिर्यादी पोलीस हवालदार रेहेपाडे बन 293 पोस्टे जवाहरनगर | **मृतक :–** सौ किरण बंडु वासनिक वय 45 वर्षे रा. साहुली | 18/10/2018 चे 00.10 वा.दरम्यान | 18/10/2018 चे 21.32 वा. | साहुली /सारु भंडारा | यातील मृतक हीची अचानक प्रकृती बिघडल्याने तीला सारु भंडारा येथे दि 17/10/2018 चे सकाळी. 10.00 वा. दरम्यान भरती केले असता उपचारा दरम्याण मृतक ही दि. 18/10/2018 चे 00.10 वा मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग कमांक 00/2018 कलम 174 जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोलीस हवालदार रेहेपाडे पोस्टे जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे नंबरी मर्ग नोदं करण्यात आला पुढील तपास पोलीस हवालदार जांभुळकर हे करित आहेत मो.न. 9421700028 |

पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्या.भंडारा

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,
जिल्हा माहीती अधिकारी, भंडारा
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द
करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता